अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, पुणे शहर.
पोलीस आयुक्त यांचे कार्यालय, ०२ साधु वासवानी रोड,
कॅम्प, पुणे-४११००१
दुरध्वनी क्रंमाक :- ०२०-२६१२६९६२/ २६२०८२३१
ई-मेल - addlcpcrime.pune@nic.in


जा.क्र.अपोआ/गुन्हे/विभागीय सपोआ/पो.स्टे.भेट/१७४/२०२५ दिनांक :२१/०३/२०२५

**विषय** :- विभागीय सहाय्यक पोलीस आयुक्त यांचे पोलीस स्टेशन भेटी बाबत...

...........

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी पुणे शहर पोलीस आयुक्तालयामधील सर्व विभागीय सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी आठवडयातील सहा दिवस आपआपले विभागातील पोलीस स्टेशनला भेट दयावी अशा सुचना दिलेल्या आहेत.

तरी आपण खालील नमूद तक्त्याप्रमाणे पोलीस स्टेशनला भेट दयावयाची आहे.

| अ.नं. | सपोआ, विभाग | सोमवार २४/०३/२५ | मंगळवार २५/०३/२५ | बुधवार २६/०३/२५ | गुरुवार २७/०३/२५ | शुक्रवार २८/०३/२५ | शनिवार तक्रार निवारण दिन २९/०३/२५ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **फरासखाना** | समर्थ | खडक | फरासखाना | समर्थ | खडक | फरासखाना |
| २ | **विश्रामबाग** | डेक्कन | शिवाजीनगर | विश्रामबाग | डेक्कन | शिवाजीनगर | विश्रामबाग |
| ३ | **लष्कर** | लष्कर | कोरेगावपार्क | बंडगार्डन | लष्कर | कोरेगावपार्क | बंडगार्डन |
| ४ | **स्वारगेट** | स्वारगेट | आंबेगाव | सहकारनगर | भारती विद्यापीठ | स्वारगेट | आंबेगाव |
| ५ | **कोथरुड** | उत्तमनगर | वारजे | कोथरुड | उत्तमनगर | वारजे | कोथरुड |
| ६ | **सिंहगडरोड** | नांदेडसिटी | पर्वती | सिंहगडरोड | अलंकार | नांदेडसिटी | अलंकार |
| ७ | **खडकी** | बाणेर | खडकी | विश्रांतवाडी | चतु:श्रृंगी | बाणेर | चतु:श्रृंगी |
| ८ | **येरवडा** | वाघोली | येरवडा | लोणीकंद | विमानतळ | खराडी | चंदननगर |
| ९ | **हडपसर** | मुंढवा | लोणीकाळभोर | फुरसुंगी | हडपसर | मुंढवा | लोणीकाळभोर |
| १० | **वानवडी** | वानवडी | बिबवेवाडी | मार्केटयार्ड | कोंढवा | काळेपडळ | वानवडी |

पोलीस स्टेशन भेटी दरम्यान यापूर्वी आपण करीत असलेल्या कार्यवाही व्यतिरिक्त खालील प्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

१३)तपास अधिकारी यांची दप्तर तपासणी घेवून त्यांचेकडे प्रलंबित असलेले गुन्हे (भाग-५, भाग-६, अकस्मात मयत), तक्रारी अर्ज निर्गती बाबत मार्गदर्शन करुन गुन्हे व अर्ज विनाकारण प्रलंबित राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

१४)पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या अडचणी जाणुन घ्याव्यात. तसेच प्रशासनविषयक अडचणी व इतर आवश्यक कामकाजाबाबत पाहणी करावी.

१५)प्रलंबित पासपोर्ट व चारित्र्य पडताळणी प्रकरणे.

१६)क्राईम रजिस्टर व इतर सर्व संबंधित रजिस्टर तपासणी करणे.

१७)नवीन कायदयांची अंमलबजावणीचे अनुषंगाने पाहणी करुन मार्गदर्शन करावे.

१८)मुद्देमाल निर्गतीबाबत आढावा घेवुन निर्गतीचे अनुषंगाने मार्गदर्शन करावे.

१९)भेटीच्या वेळी सक्रिय हिस्ट्रीशीटर्स व सक्रिय गुंड यांना हजर ठेवणेबाबत सांगून त्यांना चेक करावे. तसेच नवीन हिस्ट्रीशीटस् उघणेबाबत कार्यवाही करुन घ्यावी.

२०)प्रतिबंधक कार्यवाहीचा आढावा घ्यावा तसेच एमपीडीए, मोका मधील आरोपींबाबत आढावा घ्यावा.

२१)समन्स व वॉरंट बजावणी.

२२) दोषसिध्दीचे अनुषंगाने दत्तक घेतलेल्या खटल्यांचा आढावा घेणे.

२३) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील ॲक्शन प्लॅन २०२४ नुसार जुनी प्रलंबित (Targeted Cases) फौजदारी प्रकरणांचे निर्गतीचे दृष्टीने मार्गदर्शन करावे.

२४) वर नमुद तक्त्यामध्ये नमुद केले प्रमाणे दर शनिवारी आपण समस्या निवारण दिनाचे अनुषंगाने यापूर्वी इकडील कार्यालयाकडून दिलेल्या सुचनांप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

तसेच इकडील कार्यालयाकडून वेळोवेळी दिलेल्या सुचना व आदेश याप्रमाणे पोलीस स्टेशनस्तरावर कार्यवाही करण्यात येते का याबाबत पाहणी करावी.

**(मा.पोलीस आयुक्त यांचे आदेशाने)**

**(शैलेश बलकवडे)**
**अपर पोलीस आयुक्त,गुन्हे**
**पुणे शहर**

**प्रति,**

सर्व विभागीय सहाय्यक पोलीस आयुक्त, पुणे शहर.

**प्रत,**

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, २, ३, ४, व ५, पुणे शहर

**प्रत सस्नेह**

अपर पोलीस आयुक्त, पूर्व व पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर.

**प्रत माहितीस्तव सादर**,

मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर.
मा.पोलीस सह आयुक्त, पुणे शहर.

प्रत,

प्रभारी अधिकारी, संगणक विभाग, पुणे शहर.
२/- सदरचा आदेश पुणे पोलीस आयुक्तालयाचे वेबसाईटवर अपलोड करावा.

प्रत,

५) पोलीस नोटीस प्रसिध्दीसाठी
६) जनसंपर्क अधिकारी (पी.आर.ओ.), पुणे शहर.
२/- सदर बाबत प्रेसनोट तयार करुन त्याबाबत प्रसिध्दी दयावी.